CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. १९ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २९० वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## चंद्रपुरात ढगफुटी सदृश पाऊस; रस्ते जलमय

चंद्रपूर : शहरात आज झालेल्या पावसाने शहरवासियांची दाणादाण उडाली. अवघ्या चार तासांत २४० मिलीलिटर पाऊस बरसला. या पावसाने शहरातील बहुतांश भाग जलमय झाला. रस्त्यावरून पाण्याचे लोट वाहत होते. रस्त्यांना नदीपात्राचे स्वरूप आले. शेकडो घरात पाणी शिरले.

मागील दहा वर्षात असा पाऊस पहिल्यांदाच बरसल्याचे असल्याचे अभ्यासकांचे म्हणणे आहे.या पावसाने महानगरपालिकेची पोलखोल ही केली. सकल भागात वस्ती असलेल्या नागरिकांना या पावसाच्या सर्वाधिक फटका बसला आहे. मागील तीन दिवसांपासून संथगतीने सुरू असलेल्या पावसाने आज (मंगळवार) सकाळपासूनच रोद्र रूप धारण केले. शहरातील अनेक रस्ते जलमय झाले आहेत. नागरिकांच्या घरात पाणी शिरले. घरात शिरलेले पाणी काढण्यासाठी नागरिकांची कवायत सुरू झाली आहे. मान्सून आला मात्र, पावसाचे आगमन झाले नाही. यादरम्यान तुरळक पावसाची नोंद होत होती. यामुळे शेतकरी आणि सामान्यवर्गात चिंता व्यक्त करण्यात येत होती.अखेर आज वीजगर्जनेसह दमदार पावसाला सुरुवात झाली. सकाळपासूनच हा पाऊस सुरू होता. मुसळधार पावसामुळे शहरातील जनजीवन प्रभावित झाले आहे. आज सकाळपासूनच चंद्रपुरात मुसळधार पाऊस सुरू आहे. या पावसामुळे शहरातील रस्त्यावरून नदी पात्रासारखे पाणी वाहत आहे. ठक्कर कॉलनी, महसूल कॉलनीत पाणी शिरले आहे. गांधी चौकात असलेला शहरातील मुख्य गोलबाजार जलमय झाला आहे. अद्यापही पावसाचा जोर ओसरला नाही. चंद्रपूर शहराला पावसाने अक्षरश: झोडपून काढले आहे. शहरातील अनेक रस्ते जलमय झाले आहेत, तर ठक्कर, महसूल कॉलनीतील अनेक घरात पाणी शिरले आहे.


# भल्या-भल्यांना 'ED' चा भुंगा लावणाऱ्या किरीट सोमय्यांच्या मागे 'CD' ची पिडा

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते व माजी खा. किरीट सोमय्या हे एका भलत्याच संकटात सापडले आहेत. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना फॉर्मात असणाऱ्या सोमय्यांनी आघाडीच्या एकेक नेत्यांच्या पाठीमागे ईडीचा भुंगा लावून त्यांना जेरीस आणले होते. अनेकांच्या बेकायदा इमारती आणि रिसॉर्टच्या भानगडी उघडकीस आणल्या होत्या. राज्यात शिंदे गट-भाजप युतीचे सरकार आल्यानंतर सोमय्या हे जणू थंडच पडले. गेल्या वर्षभरात सोमय्या कुठे आहेत, अशी स्थिती होती. त्यातच काल सोमय्या यांच्या विषयी एक वादग्रस्त व्हिडिओ एका चॅनेलवर दाखवल्यानंतर राज्यभर खळबळ उडाली. विरोधकांच्या हाती एक आयते कोलित पडले. विधिमंडळ अधिवेशनात मंगळवारी विरोधकांनी सोमय्यांवर जबर बॉम्ब टाकून भाजपची धोबीपछाड केली. अधिवेशन काळात असे विषय नेहमीच येत असतात. विरोधक भाजपवर तुटून पडण्याची वाटच पाहात होते आणि सोमय्यांच्या विषय त्यांच्या हाती पडला. हे राजकीय रान खरेच पेटले की पेटवले गेले? हा संशोधनाचा विषय ठरणार आहे. विरोधकांच्या मागे ईडीची 'पिडा' लावणाऱ्या सोमय्यांच्या मागे आता मात्र बाईच्या रूपाने 'सीडी'ची पिडा लागली आहे. या सीडीची चौकशी ईडीमार्फत होणार का? असा प्रश्न विरोधकांनी फडणवीस यांना विचारला आहे.**



सोमय्यांविषयीचा एक आक्षेपार्ह व्हिडिओ व्हायरल झाला आहे. त्याचा पेन ड्राईव्ह विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मंगळवारी सभागृहात आणला. त्यानंतर सोमय्यांच्या विरोधात राज्यभर वातावरण तापले. उद्धव ठाकरे गटाचे अंबादास दानवे, अनिल परब, काँग्रेसच्या नेत्या आमदार यशोमती ठाकूर यांच्यासह अनेक नेत्यांनी सोमय्यांवर कारवाईची मागणी केली आहे. अनिल परबांनी तर सभागृहात उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांना आव्हानच दिले. ज्या पद्धतीने मराठी लोकांविषयी पेन ड्राईव्हमध्ये बोलल्याचे दिसत आहे, तो पेन ड्राईव्ह विरोधी पक्षनेत्यांनी सभापतींकडे सोपवला आहे. त्याच्या चौकशीचे आदेश देणार का, असा सवाल परब यांनी केला. परब यांच्या रिसॉर्टची पोलखोल सोमय्यांनीच केली होती. तो राग अजूनही त्यांच्या डोक्यात बसला आहे. हा राग परबांनी विधानसभेत भाजपवर आसूड ओढून बाहेर काढला.



### सखोल चौकशी होईल : फडणवीस



हाऊसमध्ये फडणवीस यांनी अगदी शांतपणे यावर उत्तर दिले. जो विषय दानवे आणि परब यांनी मांडला, तो गंभीर आहे. त्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. राजकारणात अनेक वेळा असे प्रसंग येतात, की आयुष्य पणाला लागते. यासंदर्भात आपल्याकडे तक्रारी असतील, तर त्याही आमच्याकडे द्या, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल, कुणालाही पाठीशी घातले जाणार नाही. पोलीस कायद्याच्या चौकटीत राहून त्या महिलेला हुडकून काढतील. कुणीही काळजी करू नका. प्रकरण दाबणे, दडपणे, कुणाला पाठीशी घालणे, असे प्रकार अजिबात होणार नाहीत. सखोल आणि वरिष्ठ स्तरावरची निष्पक्ष चौकशी केली जाईल. तसे आदेश तात्काळ दिले जातील, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### आता त्यांचेच वस्त्रहरण : पटोले



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी या प्रकरणावरून भाजपावर जोरदार हल्लाबोल केला आहे. दुसऱ्यांचे वस्त्रहरण करणाऱ्याचेच आता वस्त्रहरण झाले. भाजपने मागील नऊ वर्षात महाराष्ट्राला कलंक लावण्याचे पाप केले आहे. भाजपाचे माजी खासदार किरीट सोमय्या यांच्याबद्दलचा जो आक्षेपार्ह व्हिडीओ एका खासगी वृत्तवाहिनीने दाखवला आहे, तो पूर्ण बघितल्यानंतरच यावर जास्त बोलणे योग्य होईल. परंतु दुसऱ्यांचे वस्त्रहरण करणाऱ्याचे आज वस्त्रहरण झाले आहे, असे पटोले म्हणाले.

### सोमय्या काय म्हणतात...

या आरोपाविषयी सोमय्या म्हणाले, माझ्याकडून कोणत्याही महिलेवर असा अत्याचार झालेला नाही. मी देवेंद्र फडणवीस यांना अशा आरोपांची व्हिडीओची सत्यता तपासावी आणि चौकशी करावी, अशी विनंती केली आहे. मी अनेक महिलांवर अत्याचार केले, अनेक महिलांच्या तक्रारी आल्या आहेत आणि त्याच्या अनेक व्हिडीओ क्लिप आहेत, असेही दावे केले जात आहेत. तथापि माझ्याकडून कोणत्याही महिलेवर असा अत्याचार झालेला नाही, हे मी याठिकाणी स्पष्ट करतो. त्यामुळे अशा सर्व आरोपांची आपण चौकशी करावी.

### लोकांची काढतो ईडी, स्वत:ची निघाली सीडी...

उद्धव ठाकरे सेनेच्यावतीने राज्यभर सोमय्यांच्या प्रतिमेला जोडे मारो आंदोलन करण्यात आले. माळशिरस तालुक्यातील अकलूज येथे युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश इंगळे आणि शिवसेना तालुकाप्रमुख संतोषभैय्या राऊत यांनी सोमय्या यांची भाजपने तातडीने हकालपट्टी करावी, अशी मागणी केली.ठाण्यासह पाथर्डी तालुका, पालघर,भिवंडीत निदर्शने केली. उध्दव ठाकरे सेनेच्या वतीनेही चार पुतळा चौकात सोमय्यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. 'लोकांची काढतो ईडी आणि स्वत:ची निघाली सीडी' अशी घोषणाबाजी कार्यकर्त्यांनी देत सोमय्यांचे पोस्टर जाळले.

### अनेक मराठी महिलांचा छळ

आठ तासांच्या या व्हिडिओत भाजपमधील मराठी महिलांचा छळ करण्याता आल्याचा दानवे यांचा आरोप आहे.ते म्हणतात की, त्यांचा एक पेनड्राईव्ह माझ्याकडे आहे. यामध्ये अतिशय किळसवाणे व्हिडीओज आहेत. अशा लोकांवर सरकार कारवाई करणार का? याचं संरक्षण काढून घेणार का? की केंद्र सरकारकडून संरक्षण वाढवलं जाणार? याप्रकरणाची सखोल चौकशी करा, अशी माझी मागणी आहे. या व्हिडीओमध्ये सोमय्यांनी मराठी स्त्रियांविषयी ज्यापद्धतीने बोलले आहेत, ते अतिशय धक्कादायक आहे.

---

राझंणीतील खुनाचा लागला छडा

## उसने दिलेले पैसे मागितल्याचा राग धरून मेटकरींना दारू पाजून जंगलात मारले

सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर तालुक्यातील अनवली येथील अभिमान मारुती मेटकरी यांच्या खुनाचा छडा लावण्यास पोलिसांना यश आले आहे. १२ तासांच्या आत पंढरपूर तालुका पोलीस ठाणे आणि स्थानिक गुन्हे शाखेने गुन्ह्यातील आरोपीला पकडले. खून केल्याची कबुली आरोपीने दिली आहे.

मयत अभिमान मेटकरी यांनी आरोपीला उसने पैसे दिले होते. आरोपी पैसे देण्यास टाळाटाळ करत असल्यामुळे मयत आणि आरोपीचे भांडण झाले होते. भांडणाचा राग मनात ठेवून आरोपीने मयत अभिमान मेटकरी यांना दारू पाजून रांझणी येथील फॉरेस्टमध्ये अल्पवयीन मुलाच्या मदतीने खून केला. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून अनवली येथील नितीन माळी याला पोलिसांनी अटक केली तसेच एका अल्पवयीन आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. नितीन माळी याला चार दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे

### २० हजारांसाठी झाला खून

मयत अभिमान मेटकरी यांनी आरोपी नितीन माळीला सहा महिन्यांपूर्वी वीस हजार रुपये उसने दिले होते. आरोपीकडे वेळोवेळी पैशाची मागणी करून देखील नितीन माळी पैसे देत नसल्यामुळे गेल्या ८-१० दिवसांपूर्वी मयत अभिमान मिटकरी आणि नितीन माळी यांच्यामध्ये भांडण आणि शिवीगाळ झाली होती. या गोष्टीचा राग धरून नितीन माळी याने दारू पाजून अभिमान मिटकरी यांचा खून केला असल्याची माहिती पोलीस निरीक्षक मिलिंद पाटील यांनी दिली आहे.

---

## तरुणीचे अपहरण; बार्शीच्या तरुणाविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

पायी घराकडे जाणाऱ्या एका तरुणीचे अपहरण केल्याप्रकरणी बार्शीच्या पोलिसांनी दोघा तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करून तो गुन्हा धाराशिव पोलिसाकडे वर्ग केला आहे. ती तरुणी रविवारी रात्री धाराशिव येथे नातेवाईकाच्या घरापासून आपल्या घराकडे निघाली होती. त्यावेळी रोहित काळे आणि प्रेम चव्हाण (दोघे रा.बार्शी) यांनी त्यांचे अपहरण केले. अशा आशयाची फिर्याद त्या तरुणीने बार्शी पोलिसात सोमवारी दाखल केली.घडला प्रकार धाराशिव परिसरात असल्याने तो गुन्हा बार्शी पोलिसांनी धाराशिव पोलीस येथे वर्ग केला आहे.

---

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; आरोपीला २० वर्षे सक्तमजुरी

सुराज्य/सोलापूर



एका अल्पवयीन मुलीवर अत्याच्यारावर केल्याच्या आरोपावरून सचिन ऊर्फ सतीश सुभाष पाखरे (वय २४ रा.बीड) या ट्रॅक्टर चालकाला २० वर्षे सक्त मजुरी आणि १० हजार रुपये दंड अशी शिक्षा विशेष न्यायाधीश कविता डी. शिरभाते यांनी ठोठावली. ही घटना २०१८ साली दक्षिण सोलापूर तालुका परिसरात घडली होती.

दक्षिण सोलापूर तालुका परिसरात ऊस तोडीचे काम चालू होते. ती पीडित बालिका ही आई वडीला सोबत सोलापुरात राहण्यास आली होती. त्यावेळी सचिन ऊर्फ सतीश पाखरे हा ट्रॅक्टर वर ड्रायव्हर म्हणून काम करीत होता. ऊसतोडीचे काम संपल्यानंतर सर्व मजूर आपल्या गावाकडे निघून गेले होते. दरम्यान पीडित मुलीच्या पोटात दुखू लागल्याने तिला वैद्यकिय तपासणी केली असता ती गर्भवती असल्याचे आढळले.

खाजगी संस्थेच्या सामाजिक कार्यकर्त्यांनी समुपदेशन करून पिडिता आणि त्यांच्या कुटुंबीयांना पोलीस ठाण्यात तक्रार देण्यास सांगितले. त्याप्रमाणे पिडीतेच्या वडिलांनी ग्रामीण पोलिसात ३१ ऑगस्ट २०१८ रोजी फिर्याद दाखल केली होती. त्याप्रमाणे पोलिसांनी आरोपी विरुद्ध बाल लैंगिक अत्याचार अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल केला. आणि त्याला ३ ऑक्टोबर २०१८ रोजी अटक केली होती. दरम्यान पीडित बालिका रुग्णालयात प्रसूत झाली. डीएनए (रासायनिक परीक्षण) तपासणीत सदरचे बाळ हे आरोपीचे असल्याचे निष्पन्न झाले. या खटल्याच्या तपास तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक रियाज शेख यांनी करून आरोपीचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले होते.

या खटल्यात सरकार पक्षातर्फे एकूण ११ साक्षीदार तपासण्यात आले. फिर्यादी, पिडिता, संस्थेचे कार्यकर्ते, वैद्यकिय अधिकारी आणि डीएनए तपासणीचे वैद्यकिय अधिकारी यांची साक्ष महत्त्वाची ठरली. तसेच सरकार पक्षाने मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला २० वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावली. या खटल्यात सरकारतर्फे ॲड. प्रकाश एस.जन्नू तर आरोपीच्या वतीने ॲड. महेश सोलनकर यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून फौजदार विजय जाधव यांनी सहकार्य केले.

---



## शहरात दिवसभर संततधार; सूर्यदर्शन नाही

सोलापूर : शहरात मंगळवारी सकाळपासून संततधार पावसाने हजेरी लावली. त्यामुळे सोलापूरकरांना सूर्यदर्शन झाले नाही. हा संततधार पाऊस सोलापूर शहराबरोबरच जिल्ह्यातील विविध भागात सुरू आहे. मंगळवारी पहाटे चार वाजल्यापासून पावसास सुरूवात झाली. कधी जोरदार तर कधी संततधार पाऊस रात्री उशिरापर्यंत सुरू होता.

दरम्यान, संततधार पावसामुळे शहरातील सखल भागात चांगलेच पाणी साचल्याने वाहनधारकांना पाण्यातून मार्ग काढताना चांगलीच कसरत करावी लागली. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, आसरा चौक, मंगळवार बाजार परिसर, बोरामणी नाका, शेळगी परिसर, विजापूर वेस, बारा ईमाम चौक, अक्कलकोट रोडवरील काही भागातील नगरात पाणीच पाणी साचले आहे. या साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांना वाट काढताना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पावसाला सुरूवात झाली आहे. या पावसामुळे पहिल्या टप्प्यात केलेल्या पेरण्यातील पिकांना जीवदान मिळत असल्याचे बोलले आहे.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




सर्वसामान्यांनी केली तर फसवणूक, त्यांनी केलं तर राजकारण !


कल्याण
700-74-266


मेन बाजार
155-11-470


## श्रीकांत देशमुखांऐवजी घेतले विजयकुमारांचे नाव

- भास्कर जाधवांच्या वक्तव्याने वाद
- माफीनाम्याने वातावरण निवळले

सुराज्य/सोलापूर







माजी खा. किरीट सोमय्या यांच्या वायरल व्हिडिओमुळे राज्यभरात राजकीय वातावरण चांगले तापलेले असताना पावसाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवारी मात्र सोलापूरच्या अनुषंगाने एक चांगलाच वाद विधिमंडळाच्या आवारात आणि सभागृहात पाहायला मिळाला.

एका महिलेच्या प्रकरणात ठाकरे गटाचे आ. भास्कर जाधव यांनी श्रीकांत देशमुख यांचे नाव घेण्याऐवजी आ. विजयकुमार देशमुख यांचे नाव घेतले. त्यामुळे मोठा गदारोळ झाला. विधिमंडळाचे सभागृह सुरू होण्यापूर्वी माध्यमाशी बोलताना शिवसेनेचे आमदार भास्कर जाधव यांना काही पत्रकाराने किरीट सोमय्या यांच्या व्हायरल व्हिडिओवर प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी आमदार जाधव म्हणाले, भाजपा आणि देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी राष्ट्रवादीचे आमदार धनंजय मुंडे प्रकरणात करुणा मुंडे यांना, पूजा चव्हाण यांना संजय राठोड प्रकरणात न्याय मिळाला नाही.

या उलट त्यांना मंत्रिमंडळात घेत त्यांचा सन्मान केला. राहुल शेवाळे आणि बृजभूषणसिंग यांच्यावरही कोणतीच कारवाई झाली नाही. असे उदाहरण देत असताना आ. जाधव यांनी भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत देशमुख यांनी निर्मला यादव यांची फसवणूक केल्याचा विषय काढायचा होता. मात्र जाधव यांच्याकडून श्रीकांत देशमुख यांच्याऐवजी आ. विजय कुमार देशमुख यांच्या नावाचा उल्लेख झाला. त्यामुळे वाद निर्माण झाला. भास्कर जाधव यांचा व्हिडीओ ऐकल्यानंतर तत्काळ आ. विजयकुमार देशमुख यांनी विधिमंडळाच्या सभागृहात पीठासीन अधिकाऱ्यांकडे भास्कर जाधव यांची तक्रार केली.

माझ्या नावाचा काहीच संबंध नसताना माध्यमांसमोर भास्कर जाधव यांनी नाहक बदनामी केली आहे. जाधव यांनी माध्यमासमोर जाऊन पुन्हा एकदा जाहीर माफी मागून योग्य तो खुलासा द्यावा, अशी मागणी आमदार विजयकुमार देशमुख यांनी केली.

### दोन देशमुखांमधला फरक कळला नाही

भास्कर जाधव त्वेषाने बोलत असताना सोलापूरचा आणि सोलापूरचे देशमुख असा संदर्भ त्यांच्यापुढे आल्यामुळे त्यांना दोन देशमुखांमधला फरक न कळला नाही. त्यांनी श्रीकांत देशमुख यांच्याऐवजी विजय देशमुखांचे नाव घेतल्याने गोंधळ उडाला. दरम्यान, आ. जाधव यांच्या या उतावळेपणाचा सोलापूरमधील भाजपच्या कार्यकर्त्यांनी निषेध केला.

### विजयकुमार सरळ माणूस

प्रेस समोर बोलताना मी जो विजय देशमुख उल्लेख केला तो आमदार विजय देशमुख यांचा नव्हता त्यांचा या प्रकरणाशी काही संबंध नाही त्याबद्दल मी सभागृहात महाराष्ट्रसमोर खुलासा केला आहे आमदार विजय देशमुख हे सरळ साधे व चांगले व्यक्ती आहेत.

- **आ.भास्कर जाधव शिवसेना उबाठा**

---

## मुलाला मारण्यावरून दोन गटात हणामारी

सुराज्य/सोलापूर

मुलाला मारण्याच्या कारणावरून दोन गटात हणामारी झाली. याप्रकरणी दोन्ही गटाने दिलेल्या परस्पर विरोधी फिर्याद दिली असून याप्रकरणी सहा जणांवर विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.पहिल्या गटाचे हाजीमलंग दुलेसाब शेख (वय-४३, रा.गैबीपीर झोपडपट्टी, होटगी रोड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार आरोपींनी त्यांच्या मुलाला शिवीगाळ केली.

याचा जाब विचारण्यासाठी गेल्यानंतर आरोपी बसवराज कोळी, त्यांचा मुलगा व अनोळखी इसम यांनी मारहाण केली. याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. दुसऱ्या गटातील बसवराज सोनलिंग कोळी (वय-४२, आसरा सोसायटी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार त्यांच्या मुलाला आरोपीच्या मुलाने मारहाण केली.याप्रकरणी अतिक शेख, मोबिना शेख व एक अनोळखी इसमावर गुन्हा दाखल झाला आहे.